**चला खालील शास्त्रवचनांसह समाप्ती करूयाः**

"देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र [येशू ख्रिस्त] दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर [येशू ख्रिस्त] विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले. जो त्याच्यावर [येशू ख्रिस्त] विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही."[4]

"...मनुष्याचा पुत्र [येशू ख्रिस्त] सेवा करून घेण्यास नाही, तर सेवा करण्यास व पुष्कळांच्या खंडणीसाठी [मोल भरून विकत घेणे] आपला [ख्रिस्ताचा] प्राण अर्पण करण्यास आला आहे."[5]

"परंतु जितक्यांनी त्याचा [येशू ख्रिस्त] स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या [ख्रिस्त] नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने [परमेश्वर] देवाची मुले होण्याचा अधिकार दिला."[6]



देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याविषयी पवित्र शास्त्र काय सांगते?

**ते म्हणतात**

- देवाने जगावर अधिक प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र (येशू ख्रिस्त) दिला
- जर आपण देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवतो, तर आपला नाश (देवाच्या क्रोधाला सामोरे जाणे) होणार नाही तर आपल्याला सार्वकालिक जीवन प्राप्त होईल
- देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले.
- जर आपण येशूवर विश्वास ठेवतो, तर आपणावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येणार नाही
- ख्रिस्ताने त्याचे जीवन आपल्या पापांसाठी खंडणी म्हणून दिले; दुसऱ्या शब्दांत ख्रिस्ताने मोल देऊन आम्हाला विकत घेतले
- सरते शेवटी, देवाची मुले होण्यासाठी, आपल्याला येशू ख्रिस्ताचा स्वीकार करणे आणि त्यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे

1. रोमकरांस पत्र 5:6-10
2. रोमकरांस पत्र 3:23
3. 1 करिंथ 15:1-4
4. योहान 3:16-18
5. मत्तय 20:28
6. योहान 1:12

(फक्त खाजगी वितरणासाठी)

अधिक जाणून घेण्यासाठी संपर्कः

whoisjesus008@gmail.com



# येशू कोण आहे?

# येशू कोण आहे?

काही म्हणतात की येशू ख्रिस्त एक चांगला शिक्षक होता, एक चांगला माणूस, एक शक्तिशाली संदेष्टा; इतर काही म्हणतात की तो देवाचा पुत्र होता - देहात अवतरलेला देव.

तुम्हांला काय वाटतं?

येशूच्या जीवनाचा उद्देश काय होता?

हे जाणून घेणे माझ्या जीवनासाठी का महत्वाचे आहे?

या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, आपल्याला पवित्र शास्त्र काय सांगते हे पाहण्यासाठी काही शास्त्रवचनांचे परीक्षण करणे आवश्यक आहे. चला आपले वाचन सुरू करूयाः

"आपण दुर्बळ असतानाच, ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी, मरण पावला. नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा; चांगल्या मनुष्यासाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील; परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला. तर आता त्याच्या रक्ताने नीतिमान ठरवण्यात आल्यामुळे आपण विशेषेकरून त्याच्या द्वारे देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहोत. "कारण आपण शत्रू असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्यूद्वारे आपला समेट झाला, तर आता समेट झाला असता त्याच्या जीवनाने आपण विशेषकरून तारले जाणार आहोत"[1]

"...सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत; [देवाच्या गौरवशाली दर्जाला कमी आढळने]."[2]

वरील वचनांमध्ये सर्व मानवांबद्दल काही तथ्यांचा उल्लेख आहे. ते म्हणतात की आपण सर्व

- दुर्बळ (असहाय्य)
- अभक्त (अधार्मिक)
- पापी जे देवाच्या गौरवाला उणे पडले आहोत
- देवाचे शत्रू आहोत (आपल्या पापी स्वभावामुळे)
- आपण देवाच्या क्रोधाला सामोरे जाणार आहोत जर आपण त्याच्या पुत्रावर विश्वास ठेवला नाही तर

## वरील शास्त्र वचने असेही सांगतात

- अभक्त (अधार्मिक) लोकांसाठी ख्रिस्त मरण पावला (आपल्या सर्वांसाठी)
- देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला
- आम्ही ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे नीतिमान ठरवण्यात (न्यायी ठरवलेले, पूर्णपणे शुद्ध केलेले) आलो आहोत
- ख्रिस्ताच्या द्वारे देवाच्या येणाऱ्या क्रोधापासून आपण तारले (वाचलो) आहोत
- ख्रिस्ताच्या मृत्यूद्वारे आमचा समेट (देवाच्या नजरेत कृपा पावलेलो) झाला
- आपण ख्रिस्ताच्या जीवनाद्वारे तारले (वाचवले) जाऊ

**अधिक स्पष्टीकरण मिळवण्यासाठी पुढे वाचाः**

"बंधुजनहो, जी सुवार्ता [उत्तम बातमी] मी तुम्हांला सांगितली, जिचा तुम्ही स्वीकार केलात, जिच्यात तुम्ही स्थिरही राहत आहात; जिच्या द्वारे तुमचे तारण होत आहे, तीच सुवार्ता मी तुम्हांला कळवतो. ज्या वचनाने मी तुम्हांला ही सुवार्ता सांगितली त्या वचनानुसार ती तुम्ही दृढ धरली असेल; नसल्यास तुमचा विश्वास व्यर्थ आहे. कारण मला जे सांगण्यात आले ते "मी तुम्हांला सांगून टाकले, त्यांपैकी मुख्य हे की, शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्या-आमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठवण्यात आले."[3]

## सुवार्ता म्हणजे उत्तम बातमी. वरील शास्त्रानुसार कोणती उत्तम बातमी आहे?

- शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्या-आमच्या पापांबद्दल मरण पावला
- ख्रिस्त पुरला गेला
- शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तिसऱ्या दिवशी पुन्हा उठवण्यात (जिवंत होणं) आला

**ते असेही म्हणतात की आम्हांला गरज आहे**

- ह्या सुवार्तेचा (उत्तम बातमी) स्वीकार करा आणि त्यावर विश्वास ठेवा
- आपल्याला ह्या सुवार्तेला (उत्तम बातमी) स्थिर व दृढ धरून राहण्याची गरज आहे
- ह्या सुवार्तेद्वारे (उत्तम बातमी) आपण तारले गेलो आहोत